महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन ज्ञापन क्रमांक : दुरुस्ती-१११७/प्र.क्र.५५७/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक : १६ मार्च २०१८.

विषय :- पोलीस अधीक्षक, पालघर, यांच्या आस्थापनेवरील, जीवदानी देवी मंदिर, तालुका-वसई, जिल्हा-पालघर, येथील *"wireless towers"* च्या इमारतीची दुरुस्ती करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :-
1) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.
2) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
3) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ दुरुस्ती/ जीवदानी-प्रक्षे.केंद्र-विरार/ पालघर/ २७८/ २०१७, दिनांक १२.१०.२०१७.

ज्ञापन.-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी पोलीस अधीक्षक, पालघर, यांच्या आस्थापनेवरील, जीवदानी देवी मंदिर, तालुका-वसई, जिल्हा-पालघर येथील, *"wireless towers"* च्या इमारतीची दुरुस्ती करण्यासाठी रु.७,०७,०००/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

२. उक्त खर्चाचे अंदाज हे उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक १, वसई, यांनी सन २०१५-१६ च्या दरसूचीनुसार तयार केले असून ते कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर, यांनी साक्षांकित केले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले आहेत व ते **रु.६,८५,३७४/-** असे सुधारित केले आहेत व त्याप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यास, विवक्षित अटीवर, सहमती दिली आहे.

४. त्या अनुसार, पोलीस अधीक्षक, पालघर, यांच्या आस्थापनेवरील, जीवदानी देवी मंदिर, तालुका-वसई, जिल्हा-पालघर येथील, *"wireless towers"* च्या इमारतीची दुरुस्ती करण्यासाठी **रु.६,८५,३७४/-** *(रुपये सहा लक्ष, पंचाऐंशी हजार, तीनशे चौऱ्याहत्तर फक्त)* इतक्या खर्चाच्या अंदाजास, निधी उपलब्ध झाल्याशिवाय काम सुरु करु नये या अटीवर, याद्वारे, प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

५. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग--मागणी क्र. बी-१, २०५५, पोलीस, (००) १०९, जिल्हा पोलीस, (००)(०१) जिल्हा पोलीस बल (अनिवार्य) (*दत्तमत*) (२०५५ ०१६८), २७, लहान बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.७८१/इमा-२, दिनांक २१.११.२०१७, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१८०३१६१८३६२००६२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2018.03.16 18:37:21 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.
३) पोलीस अधीक्षक, पालघर.

प्रत :-

१) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी सुधारित केलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*
२) जिल्हा कोषागार अधिकारी, पालघर.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
४) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (व्यय-७/विनियम), मंत्रालय, मुंबई.
६) निवड फाईल (पोल-७).